## नियमित दिवाणी कब्जा नं.१३७/२०१२ मधील निशाणी क्र.११८ खालील आदेश.

**श्री. महादेव ज्ञानू पाटील वि. श्री. विलास राजाराम पाटील, वगैरे २**

**CNR - MHKO130001222012**

**०१.** प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी 'ज्यादा कैफियत' दाखल करुन घेण्यास परवानगी मिळयाकरीता दाखल केला आहे.

**०२.** प्रतिवादींच्या कथनानुसार, वादी यांनी प्रतिवादी यांचेविरुध्द सदरचा दावा हा आज्ञार्थी हुकूम होवून मिळणेबाबत व कायम मनाई करीता दाखल केलेला आहे. वादी यांनी वेळोवेळी दुरुस्ती अर्ज दाखल करुन दावा दुरुस्ती केलेला आहे. वादी यांनी निशाणी क्र. ६०, निशाणी क्र. १०३, निशाणी क्र. १०० व निशाणी क्र. १०५ अन्वये दुरुस्ती अर्ज तर निशाणी क्र. ९६ चा कोर्ट कमिश्नरचा अर्ज दाखल केले असल्याने प्रतिवादीतर्फे ज्यादा कैफियत न दाखल केल्याने त्यांचेविरुध्द निशाणी क्र. १ वर "ज्यादा कैफियत नाही" असा आदेश झालेला आहे. प्रतिवादी यांनी ज्यादा कैफियत दाखल करते वेळी वेळेत महत्वाची कागदपत्रे मिळू शकली नाहीत, प्रतिवादी यांना वकीलांना मुदतीत भेटून माहिती व कागदपत्रे न दिल्याने सदर कामी मुदतीत कैफियत व म्हणणे दाखल करता आलेले नाही, सदर कामी प्रतिवादी यांची ज्यादा कैफियत व म्हणणे दाखल करुन घेतलेस न्यायदान करणेस मदत होणार आहे तसेच वादी यांचे काहीही नुकसान होणार नाही. याउलट, प्रतिवादी यांची ज्यादा कैफियत व म्हणणे दाखल करुन घेतलेस न्यायदान करणे सोईचे होणार आहे. सबब, सदरचा अर्ज मंजूर करावा अशी विनंती प्रतिवादींनी केली आहे.

**०३.** सदर अर्जास वादी यांनी त्यांचे म्हणणे निशाणी क्र. ११९ वर दाखल केले असून, प्रस्तुतचा अर्ज खोटा, लबाडीचा व चुकीचा असून कायदयाने चालण्यास पात्र नाही. प्रस्तुत कामी वादीनी निशाणी क्र. ६०,

१००, १०३ व १०५ असे वेळोवेळी दुरुस्तीचे अर्ज दाखल करुन प्रस्तुतचा दावा दुरुस्त केला आहे. सदर दुरुस्ती दावेप्रमाणे वेळोवेळी वादाचे मुद्दे मे. कोर्टांनी काढून प्रस्तुतचे काम पुराव्यावर ठेवले होते. त्याप्रमाणे वादींनी नि. १०८ व ११५ वर सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दि. १८/०८/२०२२ रोजी दाखल केले आहे व त्याप्रमाणे सदरचे काम प्रतिवादींतर्फे वादीचा उलटतपास घेणेवर नेमले आहे. प्रस्तुत काम वादीचा उलटतपास घेणेस प्रलंबित असताना, दि. २४/०२/२०२३ रोजी प्रतिवादी यांनी नि. ६०, १००, १०३ व १०५ च्या दुरुस्तीस एकत्रितच कैफियत दाखल करणेस परवानगी तसेच ज्यादा कैफियत नाही असा आदेश रद्द होवून कैफियत रेकॉर्डवर घेणेबाबत अर्ज दाखल केला आहे. सदरचा अर्ज दाखल केलेल्या स्वरुपात चालणेस पात्र नाही. त्यामुळे, वादीची प्रस्तुत अर्जास तीव्र हरकत आहे. दि. ०३/०२/२०२० रोजी ज्यादा कैफियत नाही असा प्रतिवादींविरुध्द आदेश झालेला आहे. सदरचा आदेश कधी झाला याबाबत प्रतिवादींनी त्यांच्या अर्जात उल्लेख केलेला नाही. सबब, सदरचा अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा अशी वादीने विनंती केली आहे.

**०४.** उभय बाजुच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

**०५.** अभिलेखाची पाहणी करता, प्रस्तुत प्रतिवादींविरुध्द 'ज्यादा कैफियत' नाही असा आदेश पारित झालेला आहे असे दिसून येते. निश्चितपणे, वादीने वादपत्रामध्ये केलेल्या दुरुस्तीच्या अनुषंगाने प्रतिवादीस त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे गरजेचे आहे. तसे न झाल्यास नैसर्गिक न्यायतत्वाचे उल्लंघन केल्यासारखे होईल. सबब, प्रस्तुत प्रतिवादी यांना 'ज्यादा कैफियत' दाखल करण्याची संधी देणे योग्य राहील. सदरचा अर्जामुळे व प्रतिवादी यांच्यामुळे दाव्याच्या कामी जो विलंब झाला, त्याकरीता काही रक्कम खर्च स्वरुपात प्रतिवादी यांच्यावर बसविणे योग्य राहील. सबब, वरील सर्व कारणास्तव खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतोः-

## <u>- आ दे श -</u>

१. अर्ज (निशाणी क्र. ११८) प्रतिवादी यांनी वादी यांना आज तारखेपासून ७ दिवसांच्या आत रक्कम रुपये १०००/– ही खर्च स्वरुपात देण्याच्या अटीवर प्रतिवादी क्र. १ ते ३ यांची 'ज्यादा कैफियत' दाखल करुन घेण्यात येते.

Amol Bharat Jawale
Digitally signed by Amol Bharat Jawale
Date: 2023.10.09 17:36:35 +0900

कागल. (**ए. बी. जवळे**)

दिनांकः– ०९/१०/२०२३ सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कागल.